महाराष्ट्र सेवा संघाचे त्रैमासिक

आपुलकी

वर्ष २रे, अंक पहिला, २०१४

संपादक : चंद्रशेखर वझे
कार्यकारी संपादक : सुषमा पाटणकर
संपादन साह्य : द. व. कुलकर्णी
विनोद सौदागर
रवींद्र लाड
इंदिरा कुलकर्णी
रजनी करंदीकर
अरुण भंडारे
प्रकाशक : महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड
पंडित जवाहरलाल नेहरू मार्ग-महाराष्ट्र सेवा संघ मार्ग
संयोग, मुलुंड (प.), मुंबई - ४०० ०८०
दूरभाष : ०२२- २५६८ १६३१/ २५६९ ०२२५
ई मेल : mss_mulund@rediffmail.com
रचना व मुद्रण : प्रदीप सप्रे
टंकलेखन व मुद्रण साहाय्य : मेघा भावे

अंतरंग

	पान क्र.
संपादकीय	२
मुहूर्त	३
पर्यावरण आणि विकास-काही विचार	४
परमेश्वराची आळवणी	६
योगसाधनेची आवश्यकता	७
म.से.संघाच्या विविध विभागांतर्फे सादर झालेले कार्यक्रम	९
संस्थेतील आगामी कार्यक्रम	१२
यशोगाथा उद्योजकांची - दांडेकर फर्निचर	१२
एक अनुभव - आपुलकीचा	१५
एक कौतुकपत्र - जिनीमिनीसाठी	१६

आमच्या सर्व सभासदांना व वाचकांना नवीन वर्षाच्या (२०१४) हार्दिक शुभेच्छा!!

जय हिंद! जय महाराष्ट्र !!

'आपुलकी' चा अंक केवळ सभासदांसाठी उपलब्ध

या अंकातील लेखांतून व्यक्त होणारी मते सर्वस्वी लेखकांचीच असतात, 'आपुलकी' चे संपादक मंडळ त्यांच्याशी सहमत असेलच असे नाही.

संपादकीय - 'आपुलकी'चे

महाराष्ट्र सेवा संघाची घोडदौड सुरूच आहे. दर पाच-सहा महिन्यांनी एखाद्या नवीन अभिनव उपक्रमाची भर पडत असते. आता विज्ञान-विभाग सुरू होत आहे.

लहान मुले आणि विद्यार्थी यांच्यावर लक्ष केंद्रित करायचा मानस आहे. केवळ विज्ञानाचे शिक्षण, तंत्रज्ञानाचा वापर म्हणजे वैज्ञानिक दृष्टी नव्हे. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा, श्रद्धेला तडा न जाता तो विकसित व्हावा अशा भूमिकेतून काम करायचे आहे. महाराष्ट्र सेवा संघ ही ज्ञानोबा माऊलींना अभिप्रेत असलेली 'ईश्वरनिष्ठांची मांदियाळी' आहे. मुलुंडमध्ये राहूनही या संस्थेच्या भव्य लोकोपयोगी कार्याची माहिती नसलेले किंवा त्या उपक्रमात सहभागी न होणारे हे दुर्दैवीच होत. खूप दूरदूरचे लोक- मोठे दिग्गज, मान्यवर असं लेखी कळवतात की एवढं बहुविध, उच्च दर्जाचं आणि सातत्यपूर्ण काम करणारी दुसरी संस्था आमच्या पाहण्यात नाही!

गेल्या अंकात पंढरपूरचे व्यासंगी प्रवचनकार श्री. द. ता. भोसले यांचे पत्र आम्ही छापले होते. १२ जानेवारीला सु. ल. गद्रे पुरस्काराने गौरविलेले सुप्रसिद्ध विज्ञान-कथा लेखक डॉ. निरंजन घाटे यांनीही तशाच आशयाचे पत्र पाठविले आहे.तेही यथावकाश प्रसिद्ध करू.

आजूबाजूच्या अंधःकारमय भीषण परिस्थितीची पूर्ण जाणीव आम्हांला असल्यामुळेच सर्वांना मानसिक आधार व उमेद मिळण्यासाठी आम्ही 'आपुलकी'चे आनंददायी व्रत घेतले आहे. आपण देवाला सांगतो की संकटे किती भयंकर शक्तिशाली आहेत. या उलट आम्ही सैतानाला सांगत असतो की आमचा देव किती प्रबळ आहे. हा देव म्हणजे सद्वर्तन. आपण चांगले माणूस बनावे; पण आपण चांगले आहोत हे सिद्ध करण्यात वेळ घालवू नये. 'सत्'ची शक्ती एवढी वाढावी की 'असत्' ला घाबरून बाजूला व्हावे लागेल.

जगात चिरंतन (परमनंट) असं काहीच नाही; यावर चार्ली चॅप्लिन म्हणतो की याचा अर्थ दुःख, संकटे, त्रास चिरकाळ टिकणार नाही. हा आशावाद आहे. प्रामाणिकपणाच्या मार्गाने चालण्याचा एक फायदा म्हणजे तिथे गर्दी नसते! निराशावादी माणूस जहाज चालवताना वाऱ्याची तक्रार करतो, आशावादी वारा थांबण्याची वाट पाहतो. पण जो व्यवहारी असतो तो शिडे जुळवून घेतो. आपलं मन ही अशी एक पवित्र बंदिस्त खोली असते की जिच्यात तुमच्या इच्छेविरुद्ध काहीच प्रवेश करू शकत नाही. अर्थात वाईट, विध्वंसक, निराशावादी विचार मनात येऊ न देणं हे सर्वस्वी आपल्या इच्छाशक्तीवर अवलंबून असतं.

एकदा गुरुजींनी वर्गातल्या पन्नास मुलांना प्रत्येकी एक गॅसचा फुगा दिला व त्यावर आपापले नाव लिहायला सांगितले. ते सर्व फुगे एका खोलीत दोऱ्याने बांधून सोडले. ते छताला जाऊन भिडले. मग प्रत्येकाला आपापला फुगा आणायला सांगितले. पहिला येणाऱ्याला बक्षीस होते. मुलांची एकच झुंबड उडाली. बऱ्याच झटापटीनंतर दोन-चार मुले अर्ध्या तासाने आपापला फुगा घेऊन आली.

नंतर गुरुजींनी पुन्हा फुगे खोलीत वर सोडले आणि सांगितले की प्रत्येकाने एक फुगा पकडून तो ज्याचा आहे त्याला द्यावा. पाच मिनिटांत प्रत्येकाच्या हातात आपापला फुगा होता. म्हणजे जो स्वतःचे स्वतःसाठी शोधतो तो गडबडतो; पण दुसऱ्यासाठी केलं तर दोघांचं हित असतं. 'विन-विन' परिस्थिती होते. आणि हेच आमचं धोरण आहे. परस्परांच्या सहकार्याने सर्वांचा विकास!

मुलुंडमधले प्रसिद्ध विधिज्ञ आणि बांधकाम व्यवसायी श्री. अजित करंदीकर यांनी पुरस्कृत केलेला 'कै. ग.के. करंदीकर'उद्योजक सन्मान सोहळा अतिशय उत्तम तऱ्हेने झाला. उद्योजकांच्या गप्पांमधून अनेकांना सकारात्मक दृष्टी आणि प्रेरणा मिळाली.

एखादा सैनिक लढतो तो समोरच्या शत्रूचा द्वेश करतो म्हणून नव्हे, तर तो त्याच्या मागे असलेल्या लोकांवर प्रेम करीत असतो म्हणून! आमची लढाई ही निराशावादाची, पराभूत मनोवृत्तीशी, रडकेपणाशी आहे कारण सकारात्मक, विधायक, आशावादी लोकांवर

आमचं प्रेम आहे. असे लोक मोठ्या संख्येने आनंदात न्हाऊन निघावेत.

एकच लक्षात ठेवू या... ज्या दिवशी आपण एकदाही हसलो नाही तो आपल्या आयुष्यातला अगदी फुकट गेलेला दिवस. जो हसतमुख असतो त्याची सर्व कामे सुरळीत होतात. परमेश्वर चांगल्या गोष्टीचं फळ लगेच देत नाही अशी तक्रार करताना हेही लक्षात ठेवू या की तो आपल्या प्रत्येक चुकीची लगेच शिक्षाही करीत नाही!

तेव्हा चांगलं वागू या. हसरं जग निर्माण करू या!

संस्थेचे सांस्कृतिक सभासदत्व

वर्षभरात संस्थेतर्फे मुलुंड आणि ऐरोली येथे मिळून उत्कृष्ट दर्जाचे सुमारे १०० कार्यक्रम सादर होतात. ते बहुतांश सर्वांसाठी विनामूल्य असतात. पण त्यांचा तपशील घरपोच मिळण्यासाठी आपण सांस्कृतिक सभासद होऊ शकता. सर्व कुटुंबच नव्हे तर शेजाऱ्या-पाजाऱ्यांनाही याचा लाभ होईल.

शुल्क अगदी नाममात्र,

मुलुंड - रु.५००/- प्रतिवर्ष

ऐरोली - रु. ३५०/- प्रतिवर्ष

आजीव सभासदत्वासाठी संस्थेकडे चौकशी करा.

एकूण काय?

''आठवड्यातील सहा दिवस तू काय काय करतोस?''

''काही विशेष नाही''

''आणि रविवारी?''

''अरे, रविवारी तर सुट्टीच असते!''

'मुहूर्त'

या वर्षीच्या लग्नसराईत बऱ्याच लग्नांना जाण्याचा योग आला. मुख्य म्हणजे बरीच लग्ने आडवारी होती. त्यामुळे घरातल्या इतर 'बिझी' लोकांपेक्षा कुटुंबाच्या वतीने आमच्यासारख्या रिटायर्ड अर्थात रिकामटेकड्यांना हजेरी लावणे भाग पडले. काही वर्षांपूर्वी लग्ने आडवारी असली तरी आम्हाला सकाळी लग्नसमारंभात हजर राहून मुहूर्ताच्या अक्षता टाकून ऑफीसात जाणे शक्य असायचे. कारण तेव्हा बहुतेक मुहूर्त १० वाजेपर्यंत असायचे आणि गावाकडे , खेड्यात होणाऱ्या लग्नांचे मुहूर्त त्यांच्या सोयीचे म्हणजे 'गोरज' मुहूर्तावरचे सायंकाळचे असायचे. आता गेली पाच सात वर्षे पाहते आहे, तर सारे मुहूर्त ११।। ते चक्क दुपारी एक वाजेपर्यंत असतात. कारण माझ्या दृष्टीने 'मुहूर्त' ही एक प्रकारची सोयच आहे की काय असे वाटण्याइतके ह्या वेळात बदल होत गेले. एवढ्या उशीराचे मुहूर्त ठरवून सुद्धा कितीतरी वेळ टळून गेल्यावर १०/१५ मिनिटे उशीराने लागतात. त्याबद्दल कोणाला फारसे काही बिघडले असेही वाटत नाही. बरे कारणे तरी काय? एक ब्युटीशियन,आयत्या वेळी गायब होणारा मामा किंवा मुहूर्त घटकेची जराही पर्वा न करता नाचणारे 'बाराती.' अशा वेळी प्रश्न पडतो की खरंच 'मुहूर्त' पाळणे महत्त्वाचे नसते मग ते का ठरवतात? की ती एक 'सोय' किंवा 'व्यवस्था' आहे? कारण ज्याप्रमाणे अगदी 'सुमुहूर्त सावधान' ला लागलेली लग्ने यशस्वी होतात असे नाही तशीच केवळ सोय/सुट्टी पाहून नोंदणी केलेले विवाहही खूपदा यशस्वी ठरतात. माझ्या माहितीत तर एक भास्कराचार्यांच्या लीलावतीचे उदाहरण सोडले तर मुहूर्त टळल्याने आयुष्यात काही आपत्ती ओढवल्याचे ऐकीवात नाही.

'मुहूर्त' पाहून कृती करण्याचे प्रयोजन मला तरी कधीच वाटत नाही. नीट विचार करून सांगा आयुष्यातल्या कोणत्या महत्त्वाच्या गोष्टी सुमुहूर्तावर होतात ?आपला या जगातला एक व्यक्ति म्हणून होणारा प्रवेश मुहूर्तावर होतो ? आपल्या आयुष्याची सुरवातच

अशी शुभाशुभ, न पाहता होते. अगदी सर्वपित्री अमावस्येला जन्मलेल्या व्यक्ति अगदी दसऱ्या दिवशी जन्माला आल्याप्रमाणे समाधानी व यशस्वी आयुष्य जगतात. मग कोणी ज्योतिषी काहीही सांगो.

दुसरी गोष्ट शिक्षणाची ! ही आयुष्यातली अत्यंत महत्त्वाची गोष्ट सुद्धा मुहूर्त न पाहता होते. सर्व साधारणपणे शाळेच्या पहिल्या, किंवा फारच रडारडी झाली तर दुसऱ्या दिवशी आपण शिक्षणाला सुरवात करतो. म्हणजे बहुधा ७/१० किंवा १४ जूनला !

आयुष्याची तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे परीक्षा ! शिक्षण पर्वात परीक्षांना अत्यंत महत्त्व आहे. कारण परीक्षांमधून मिळणारे यश किंवा अपयश हेच बहुतेक आणि बहुतेकांच्या जीवनातल्या यशापयशाचे महत्त्वाचे कारण असते.त्यमुळेच आयुष्याला वळण किंवा कलाटणी मिळत असते. अर्थात काही सन्माननीय अपवाद वगळता! तरी खरं सांगा, या परीक्षा आपण मुहूर्त पाहून देतो का? आणि तरीही वर्षानुवर्षे परीक्षांचे निकाल साधारण योग्यच असतात. म्हणजे हुषार, घासु आणि अभ्यासु मुले यशस्वी होतात आणि ढढ्ढोबांची, आळशांची,उनाडांची गच्छंती. एखादा दिवस 'बरा' नाही म्हणून रिझल्ट वाईट किंवा 'शुभ'दिवशी झालेल्या परीक्षांना सर्वच पास असे दिसत नाही.

ह्या सर्वांपेक्षा मोठ्ठी गोष्ट असते आपण 'कमावते' होऊन आपल्या पायावर उभे राहतो ही! त्यासाठी आपण देतो ते नोकरीसाठीचे इंटरव्ह्यू अर्थात मुलाखती ही 'मुहूर्त'पाहण्याची गोष्टच नसते. त्याचप्रमाणे नोकरीचा 'पहिला दिवस' ठरवणे ही अगदी महत्त्वाची बाबही आपण ठरवू शकत नाही.

ह्या मी खूप महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या की आपण त्यांचे महत्त्व ओळखूनही मनाप्रमाणे 'सुमुहूर्त' साधून करू शकत नाही. तशीच आयुष्यातली शेवटची महत्त्वाची गोष्ट म्हणजे मृत्यू! ज्या व्यक्ति 'मृत्यूनंतरचे जीवन','मोक्ष', किंवा मृत्यू म्हणजे 'दुसऱ्या सुंदर आयुष्याची सुरवात' वगैरे कल्पनांवर विश्वास ठेवतात त्यांनाही आपल्या मृत्यूचा दिवस-वेळ ठरवणे शक्य होत नाही. अर्थात काही संतमहात्म्यांचा अपवाद असू शकतो. पण खरोखरच्या महात्म्यांना शुभाशुभाचे महत्त्व नसे. मग प्रश्न पडतो की लग्नमुहूर्ताचाच का अट्टाहास? कारण मंगल कार्यालयांची उपलब्धता रजेची,सुट्टीची सोय, ऋतूपरत्वे येणाऱ्या अडचणी ह्याचा विचार करूनच 'सोय' पाहणे ह्यालाच का मुहूर्त म्हणू नये ? कारण आडवारी आणि आडवेळेला होणाऱ्या लग्नापायी १०० लोकांनी उगीच सुट्टी घेऊन 'मुहूर्त' साजरा करणे आपण कधी थांबविणार ?

अंजली कोनकर
दूरध्वनी २५६४५५२९/९८२११४७५३

पर्यावरण आणि विकास-काही विचार

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड संस्थेने मे २०१३ मध्ये पर्यावरण तज्ञ डॉ. माधवराव गाडगीळ, यांना पर्यावरण आणि विकास ह्या विषयाबद्दल संबोधित करण्यासाठी पाचारण केले होते. पर्यावरण ह्या विषयातील पुरस्कार प्राप्त डॉ. माधवराव गाडगीळ यांनी गोवा, केरळ, कोकण, भीमाशंकर वगैरे प्रदेशांत काही प्रकल्पांमुळे पर्यावरण आणि जैव-विविधता ह्याचा कसा ऱ्हास होत आहे हे सोदाहरण संबोधित केले. सरकार व इतर माध्यमे ह्या प्रकल्पांबद्दल कशी अनास्था दाखवतात आणि पर्यावरणीय ऱ्हासाकडे दुर्लक्ष करतात ह्याबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, आपल्यासारख्या लोकशाहीमध्ये कायदे पाळले जात नाहीत आणि कायदे अंमलात आणले जात नाहीत ही परिस्थिती योग्य नाही. सन २००२ चा जैव विविधता कायदा दुर्लक्षित केला जातो. महाराष्ट्रातील पश्चिम घाटात हे घडत आहे. पण सरकारच्या राजकीय हितसंबंधामुळे, खोटा प्रचार करून, प्रगत देशांनी केलेल्या चुका आपण आपल्या प्रदेशात पुन्हा करीत आहोत असा मुख्य विचार त्यांनी मांडला. डॉ. गाडगीळ यांनी जे विचार मांडले त्याची कास धरून ह्या विषयाबद्दल पुढील विचार मांडत आहे.

मानवाने, स्वतःच्या उन्नतीसाठी,

सुखसोईसाठी विकास करावयाचा, हे ठरवल्यावर अनेक प्रवाहाने विकास साध्य करण्याचे अवलंबले. विकास करताना नैसर्गिक पर्यावरणाचा विचार , १९६० पर्यंत तरी विकसीत देशांनी केला नाही हे सत्य आहे. ह्या मागील भूमिका म्हणजे ''पर्यावरणाचा विचार नंतर करू, आता उन्नती करूया!'' याच मनोभूमिकेतून बरीच वर्ष उन्नती केल्यावर काही देशांच्या लक्षात आले की पर्यावरणाचा ऱ्हास तर होत आहेच, त्याच वेळेस अर्थकारण, आरोग्य बऱ्याच प्रमाणात धोक्यात येण्याची प्रक्रिया सुरू होऊन अनभिज्ञपणे मानवाने उलट्या दिशेने वाटचाल केली आहे. ह्याची परिणती म्हणजे विकास आणि पर्यावरण ह्या दोन्ही गोष्टी परस्पर विरोधी समजल्या जाऊ लागल्या. आरोग्याचा ऱ्हास जेव्हा दृष्य स्वरूपात दिसायला लागला तेव्हा मात्र सर्व देश खडबडून जागे झाले आणि जागरूकता निर्माण झाली. सर्वांना कळून चुकले की, '' आता विकास आणि नंतर स्वच्छता'' हे धोरण चालू ठेवल्यास विनाशाकडे वाटचाल होण्याची शक्यता आहे. जपान व युरोपिय देश यांनी पुढाकार घेतला, अर्थ व्यवस्थापक त्यात अग्रणी होते. उपायांचा विचार करता दोन पर्याय सुचवले गेले.

- अभियांत्रिकी माध्यमातून, ऱ्हास होणार नाही यांचे निकष अंमलात आणावेत.
- करप्रणाली लावून मगच प्रगतीसाठी अनुमती द्यावी.

सन १९६० नंतरच्या विचार प्रक्रियेतून बऱ्याच गोष्टी ध्यानात येऊ लागल्या. पाण्याची उपलब्धता, शाश्वतता आणि संरक्षण ह्याकडे दुर्लक्ष झाले आहे. कार्बन उत्सर्जनामुळे जागतिक तापमानात वाढ व इतर समस्या सुरु झाल्या आहेत आणि भविष्यात मोठ्या प्रमाणावर भेडसावणार आहेत. कार्बन उत्सर्जनात चीन, अमेरिका, भारत वगैरे देश अग्रगण्य आहेत. साधारण ४ डीग्री सेल्सिअस तापमान वृद्धी मानवाच्या या कृतीमुळे झाली आहेच पण काहीही धडा न शिकता आणि जागतिक पातळीवर विचार न करता हरित वायू उत्सर्जनाचा कायदा नीट पाळला जात नाही. साधारण ४० वने धोक्यात आली असून त्याकडे दुर्लक्ष केले आहे. जैव विविधता, प्राणी आणि वनस्पती यांचे संतुलन राखण्यात दुर्लक्ष करीत आहोत आणि किटकनाशकांचा वापर कमी करण्यात हयगय करीत आहोत. हिरव्या पानांचे रक्षण, वृक्ष संवर्धन, घटलेली हत्तीची संख्या, उत्तर ध्रुव प्रदेशातील बदल ह्याकडे डोळसपणे पाहिले जात नाही. प्राण्यांच्या रक्तातील पाऱ्याचे प्रमाण वाढलेले लक्षात आल्यावरही ह्या घटनेकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. भारताचा विचार केल्यास २०३० पर्यंत तापमान २ डीग्री सेल्सिअस आणि २०५० पर्यंत ४.८ डीग्री सेल्सिअस वाढण्याची शक्यता आहे. जगामध्ये १८ जैव विविधता असलेल्या जागांमध्ये २ जागा भारतात आहेत. त्यांचा ऱ्हास होणार नाही याचा विचार करणे गरजेचे आहे. साधारणतः १,१५,००० जाती शोधल्या गेल्या आणि बऱ्याच असू शकतात. घन कचरा, अंदाधुंदपणे शहरांचा विकास,रोगवाहक कारखाने याचा साकल्याने विचार करायला पाहिजे, अर्थात जे भारताबद्दल सांगितले तीच गोष्ट इतर बऱ्याच देशांना लागू पडते.

आणखी काही चुकांची जंत्री देता येईल. आरोग्याचे झालेले नुकसान आणि औद्योगिकरणामुळे पर्यावरणातील तोल कसा सांभाळला गेला नाही ह्या सर्व गोष्टी प्रगतशील देश मागील ४० वर्ष अवलोकन करीत आहेत. प्रगत देशांनी केलेल्या चुकांची नोंद घेत आहेत. पण त्यापासून चुका पुन्हा न करण्याचा तोल अजुनही सांभाळला जात नाही असे दिसते. भारतात सर्व नद्यांचे पाणी दूषित होत आहे हे आपल्याला कळते पण त्याबाबतच्या उपाययोजनेत भारत देश कमी पडत आहे. हे दारूण सत्य आहे. भारताला नैसर्गिक साधन संपत्ती, वने, जैव विविधता याची मोठी श्रीमंती उपलब्ध असूनसुद्धा अजूनही पर्यावरण ऱ्हासाकडे पाहिजे त्या प्रमाणात गांभीर्याने बघण्याची वृत्ती दिसत नाही. त्यामुळे प्रतिवर्षी जी.डी.पी. ऱ्हास होत आहे असे दिसते हवेचे प्रदूषण, जल प्रदूषण, जमिनीचा ऱ्हास, जंगले वगैरे संपत्तीचा ऱ्हास १ ते २ टक्के प्रमाणात सातत्याने होत आहे.

कोणत्या गोष्टींचा विचार सर्वात्मिक पद्धतीने व्हावयास पाहिजे ?

अर्थातच शेतजमीन आणि पिकांच्या जमिनीचे क्षेत्रफळ, शुद्ध पाण्याची उपलब्धता व प्रत, जंगलाचे प्रमाण, जैव विविधता, खनिज साठे; समुद्रकिनारे प्रतिमाणशी जमिनीची उपलब्धता, सांडपाणी निचरा, गवताळ जमिनी, मासेमारीच्या जागा, कार्बन वायू सामावून घेण्याची क्षमता आणि ह्या सर्वांचा एकत्रित विचार म्हणजे ''इकॉलॉजिकल फुटप्रिंट.'' ह्या अनुषंगाने आणखीन काही महत्त्वाच्या गोष्टींचा विचार करणे जरूरीचे आहे. मुख्यत्त्वेकरून आर्थिक निकषांचा विचार केला गेला पाहिजे. दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या, शुद्ध पिण्याच्या पाण्याचे साठे, उत्तम स्वच्छता म्हणजे सॅनिटेशन, बालमृत्यूचे प्रमाण, गरोदर बायकांच्या मृत्यूचे प्रमाण, पाण्याची उपलब्धता, हवेतील सूक्ष्म कण, जंगलांची प्रत आणि इतर गोष्टीचा विचार म्हणजेच इकॉलॉजीचा ऱ्हास किती झाला आहे याचे अनुमान सिद्ध करणे.

वरील सर्व गोष्टींचा अभ्यास करायचा झाल्यास पर्यावरणीय विज्ञान शाखेतील अनेक उपशाखांचा अभ्यास करावा लागतो. त्यामध्ये जीवशास्त्र, भूगर्भशास्त्र, खनिजशास्त्र, समुद्रविज्ञान शास्त्र, हवामान शास्त्र वगैरे अंतर्भूत होतात. ह्या उपशास्त्रातील काही निकष फार महत्त्वाचे आहेत. त्यामध्ये कार्बन साखळी, नायट्रोजन साखळी, खाडी व किनारे, समुद्रपातळी, हवामान बदल, हरित वायू, प्रदूषके आणि इतर निरनिराळ्या उपविषयांचे अभ्यास अपेक्षीत असतात.

पर्यावरण आणि विकास हे दोन्ही शब्द परस्परांशी विरोधात आहेत ही विचारसरणी आणि मानसिकता बदलण्याची नितांत गरज आहे. त्यातील अंतर्भूत विषय आणि उपविषय काय असू शकतात आणि त्यांचा संबंध फक्त पर्यावरणाच्या असमतोलपणात नसून प्रत्येक उपविषय विकासाशी कसा जोडला गेला आहे ह्यांचा अभ्यास करणे जरूर उद्बोधक ठरेल.

सुरेश ना. पाटणकर
दूरध्वनी - ९३२२२७२७७७

''परमेश्वराची आळवणी''

नामवंत बासरी व स्वरमंडल वादक व लेखक पं. अरविंद गजेंद्रगडकर यांना एका संस्थेतर्फे कलाकार पुरस्कार प्राप्त झाला.सोहळ्यास उपस्थित रहाण्याचे भाग्य मला लाभले. सत्काराला उत्तर देताना पंडितजींनी सर्वप्रथम सर्वशक्तिमान अशा परमेश्वराचे आभार मानले. हा सोनीयाचा दिन आयुष्यात आल्याबद्दल परमेश्वराजवळ कृतज्ञता व्यक्त करताना भाषणाच्या ओघात जीवनातील अशा कृतज्ञतापूर्तीच्या अनेक प्रसंगांचा उल्लेख केला. त्यावेळेस मनात आलं की, जीवनात सुखदु:खांचे असे अनेक प्रसंग येतात. दु:खाच्या क्षणी परमेश्वराची जेवढी आठवण केली जाते तेवढी सुखाच्या क्षणी केली जात नाही. किंबहुना आपल्याला सुख देणे हे परमेश्वराचे कर्तव्यच असल्याची भावना सर्वसामान्यांच्या मनात असते. दु:खाचे डोंगर कोसळताच माणूस कोलमडतो, परमेश्वराचा धावा करू लागतो, जपजपादी अनुष्ठानांचा आधार घेतला जातो, देवाला साकडे घातले जाते व वेळप्रसंगी तर देवाला पाण्यात बुडवून प्रार्थना करण्यापर्यंत मजल जाते. सर्वसामान्यांच्या या साहजिकपणे उमटणाऱ्या प्रतिक्रिया असतात.

पंडितजींनी जेव्हा परमेश्वराचे आभार मानले तेव्हा या माणसाचे मोठेपण जाणवले. अशी कृतज्ञतापूर्तीची भावना मानवाचे जीवन सुखकर करते. सुखाचे क्षण नेहमीच हवेहवेसे असतात. अशा वेळेस परमेश्वराची स्तुती जरूर करावी.

दु:खद प्रसंगाच्या चाहुलीनेच माणूस गळपटतो. अशा वेळी मात्र देवाचा धावा करताना गडबडून न जाता देवाजवळ दु:खाला सामोरे जाण्याचे बळ मागावे. या संदर्भात खूप वर्षांपूर्वी वाचनात आलेली

परमेश्वराची आळवणी डोळ्यासमोर तरळून गेली.

''परमेश्वराची आळवणी''

''विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर
ही माझी प्रार्थना नाही
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये
एवढीच माझी इच्छा,
दुःख पिडीत मनाचे तू सांत्वन करावे
ही माझी प्रार्थना नाही
दुःखावर विजय मिळविता यावा
एवढीच माझी इच्छा,
जीवनाच्या महासागरात तू मला तारावं
ही माझी प्रार्थना नाही
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं
एवढीच माझी इच्छा,
दुःखाच्या क्षणी मला सावरावं,गोंजारावं
ही माझी प्रार्थना नाही
तुझ्या अस्तित्त्वाविषयी मनात शंका नसावी
एवढीच माझी इच्छा!''

श्री. मुकुंद बालंखे -०२२२७७१२३५०

योगसाधनेची आवश्यकता

कोणत्याही वस्तू अथवा शास्त्राची निर्मिती गरजेपोटी होत असते. त्याचप्रमाणे योगसाधना व अधिक व्यापक अर्थाने योगशास्त्रांची निर्मिती ही मूलतः अध्यात्मिक उन्नती साधण्याचा मार्ग म्हणून झाली. आजकालच्या जगात खऱ्या अर्थाने अध्यात्मिक उन्नतीची आस फारशी कोणाला असेल असे वाटत नाही तरी ही योगसाधनेचे महत्त्व अजिबात कमी होत नाही कारण अध्यात्मिक उन्नतीपर्यंत पोहोचण्यापूर्वी सुदृढ शरीर, प्रसन्न शांत मन, संतुलित विचार हे महत्त्वाचे टप्पे योगसाधनेच्या आधारे गाठता येतात.

शारीरिक, मानसिक स्वास्थ्यासाठी नियंत्रित आहार, नियमित विहार,संतुलित विचार, पुरेशी विश्रांती ही चतुःसूत्री महत्त्वाची आहे. आज आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाने उत्तुंग झेप घेतली आहे. वैद्यकीय , आर्थिक सामाजिक तसेच कलाक्षेत्रात प्रगल्भ विचारांच्या व भरपूर संशोधनाच्या आधारे नेत्रदीपक प्रगती झाली आहे.पूर्वीच्या तुलनेत आज भौतिक सुखसोयींची साधने आणि आरोग्यविषयक ज्ञान मोठ्या प्रमाणावर उपलब्ध्द झाले आहे याचा परिणाम म्हणून समाजात शारीरिक, मानसिक, स्वास्थ्य व सौख्य वाढावयास हवे होते, या उलट अगदी लहान मुलांपासून ते वृद्धापर्यंत शारीरिक व मानसिक व्याधींचे प्रमाण कमी न होता उलट लक्षणीय प्रमाणात वाढलेले दिसते म्हणजेच कुठे तरी काहीतरी कमी पडते आहे. चुकते आहे. ही कमतरता योगसाधनेच्या आधारे बऱ्याच प्रमाणात भरून काढता येईल असे वाटते.

प्राचीन काळातील योगिक ज्ञान सुमारे २२०० वर्षांपूर्वी प्रथम पतंजली ऋषींनी अतिशय सुसूत्रपणे आपल्या प्रसिद्ध पातंजल योगसूत्रात एकत्रित केले. पतंजलींच्या अष्टांग योगातील यम आणि नियम हे सुरूवातीचे दोन टप्पे आहेत.

१. यमः- यम म्हणजे काया वाचा तसेच मनाने सुद्धा

दुसऱ्याला न दुखावणे .

☑ सत्यः- व्यवहारात कधीही खोटेपणा न करणे

☑ अस्तेयः- दुसऱ्याच्या मालकीच्या वस्तूंची अभिलाषा न धरणे.

☑ ब्रह्मचर्य :- संयमितरित्या जीवन व्यतीत करणे, शुद्धतेचा आग्रह धरणे, अतिपणा टाळणे.

☑ अपरिग्रहः- अनावश्यक गरजा कमी करणे. मोह आसक्ती यांस आवर घालणे.

२. नियमः- म्हणजे व्यक्तीने व्यक्तीगत जीवनात कसे वागावे याबद्दलचे नियम यामध्ये :-

शौचः- काया, वाचा, मनाची शुद्धता

संतोषः- न मिळालेल्या गोष्टींबद्दल दुःखी न होता मिळाले आहे त्या बाबत समाधान आनंद मानणे

३. तपः- परिश्रम करणे, काया वाचा मनाच्या आधारे सतत प्रयत्नशील राहणे महत्त्वाचे आहे

४. अष्टांगयोगात प्राणायामाची योजना चौथ्या टप्प्यात केली आहे. मानसिकस्थिती आणि श्वासगती यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. मन स्वस्थ नसेल तर श्वासोच्छवास अनियमित जलद गतीने होतो,असा आपला नेहमीचा अनुभव आहे. यामुळेच श्वासोच्छवासाचे जर नियमन योग्य प्रकारे केले तर मन शांत संतुलित आणि प्रसन्न होण्यास मदत होते. जाणीवपूर्वक श्वासप्रश्वाचाची गती नियमित करणे यालाच 'प्राणायाम'असे म्हणतात. मनाची एकाग्रता वाढविण्यासाठी प्राणायामाचा चांगला उपयोग होतो.

यम नियम व योगासने आणि प्राणायाम हे योगसाधनेतील पहिले चार टप्पे आपण पाहिले. हे बहिरंग साधना म्हणून ओळखले जातात. कारण या साधनेचे परिणाम दृष्य स्वरूपात जाणवतात व ही साधना शारिरीक व सामाजिक स्तरावर केली जाते.

अष्टांगयोगातील पुढील चार टप्पे हे केवळ व्यक्तीगत मानसिक स्तरावरील साधना आहे आणि ती दृष्य स्वरूपात जाणवत नाही त्यामुळे त्यास अंतरंग साधने असे म्हणतात.

स्वाध्याय :- वाचन, मनन, चिंतन करणे, सत्संग करणे. ईश्वर प्राणिधान :- उत्तम कर्माबरोबरच ईश्वराचे अधिष्ठान मानणे

आपल्या लक्षात येईल की लहानपणापासूनच खरोखर प्रत्येकाने यम नियमांचे पालन केले तर सर्व समाज किती सुखी होईल. हिंसा, कुविचार चंगळवाद यामुळे निर्माण होणाऱ्या शारीरिक व्याधी, मानसिक ताणतणाव यापासून सुटका होईल.

यम नियमांच्या आधारे वैयक्तिक आणि सामाजिक स्वास्थ्याचा विचार केल्यानंतर अष्टांगयोगात आसने या तिसऱ्या टप्प्यात शारीरिक सुदृढतेसाठी योगासनांची योजना केली आहे.

योग्य प्रकारे नियमित योगसाधनांचा अभ्यास केल्यास स्नायू लवचिक होतात. रक्ताभिसरण सुधारते स्नायूताण नियमित होतो. अंतस्त्रवी ग्रंथींचे कार्य नियमित होते चयापचयाची क्रिया सुधारते. एकूणच शरीर स्वास्थ्यावर दिर्घकालीन चांगला परिणाम दिसून येतो. योगासनांचा प्रामुख्याने व्याधीप्रतिबंध म्हणून चांगला उपयोग होतो. योगासनांबरोबरच अंतर्गत शारिरीक शुद्धतेसाठी शुद्धीक्रियांचाही तात्काल उपचार म्हणून चांगला उपयोग होतो. योगाभ्यास नियमित योग्य प्रकारे आणि योग्यप्रमाणात क्षमतेनुसार करणे महत्त्वाचे आहे.

५. प्रत्याहार :- हा अष्टांग योगातील पाचवा व अंतरंग साधनेतील पहिला टप्पा आहे. आपली ज्ञानेंद्रिय तसेच मन बहीःमुखी आहे. ती सभोवतालच्या परिस्थितीची जाणीव आपल्या बुद्धीला करून देत असतात. आपले मन ही बाह्य जाणीवांमध्येच व्यग्र राहते व सतत बदलत्या बाहेरील परिस्थिती प्रमाणे दोलायमान राहते. अध्यात्मिक उन्नतीसाठी मनन, चिंतन, अंतर्मुख होणे आवश्यक आहे. म्हणून पंचेद्रियांवर सतत होणाऱ्या जाणीवांकडे दुर्लक्ष करणे त्यांना मनापर्यंत आणि बुद्धीपर्यंत पोहचू न देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करणे यास प्रत्याहार असे म्हणतात.

६. धारणाः-प्रत्याहाराच्या अभ्यासानंतर सहावा टप्पा म्हणजे धारणा. प्रत्याहारानंतर बाह्य ज्ञान

जाणीवा रोखल्यानंतर आपल्या मन व बुद्धीला ठराविक विचारांचे मनन, चिंतन करण्यास मोकळीक मिळते. अशा प्रकारे मोजक्या ठराविक विचारांची मर्यादा मन बुद्धीवर काही काळापुरती घालणे आणि त्याच विचारात मनात गुंतवून ठेवणे यास धारणा असे म्हणतात. यानंतर अष्टांग योगाच्या सातव्या टप्प्यात धारण केलेल्या ठराविक विषयांपैकी केवळ एक विषय निवडून मन काही काळ त्यावरच एकाग्र होईल तसे आपले स्वतंत्र अस्तित्त्व विसरत साधक त्या ध्यान विषयाशी एकरूप होऊ लागतो. साधकाची मनाची चंचलता पूर्णपणे थांबते वृत्ती शांत होतात यास ध्यान लागणे असे म्हणतात. समाधी हा अध्यात्मिक उन्नतीतील सर्वोच्च टप्पा आहे. समाधी अवस्थेत व्यष्टी समष्टी आत्मा आणि परमात्म्याची एकरूपता अनुभवास येते असे म्हटले जाते.

सामान्य व्यक्तींच्या दृष्टीने अष्टांग योगातील हे सात महत्त्वाचे आणि प्रयत्नसाध्य टप्पे आहेत.

योगसाधनेच्या माध्यमातून आसन आणि प्राणायामाद्वारे आपल्याला शारीरिक, मानसिक, भावनिक आणि अध्यात्मिक या स्तरावर चांगला परिणाम साधता येते.

आजकालच्या धावपळीच्या चंगळवादी क्षणोक्षणी मोहात पाडून मानसिक उद्वेग उत्पन्न करणाऱ्या भोवतालच्या परिस्थितीमुळे आपल्याला अनेक शारिरीक व मानसिक अशा मनोकायिक व्याधींना सतत सामोरे जावे लागते. योग्य मार्गदर्शनाखाली क्षमतेप्रमाणे आणि नियमित योगसाधना केल्यास अशा व्याधींना निश्चित प्रतिबंध करता येईल.

श्री. अविनाश के. पटवर्धन
सौ. ललिता अ. पटवर्धन
दूरध्वनी : २५६३०४४८

उपदेश

त्याने आपल्या खास भाषणात कर्मचाऱ्यांना सदाचार, प्रामाणिकपणा, कष्ट, मेहनत, विश्वास इत्यादिंचा उपदेश केला.
बिचारा आज निवृत्त होणार होता.

महाराष्ट्र सेवा संघाच्या विविध विभागांतर्फे संपन्न झालेल्या मुख्य कार्यक्रमांचा आढावा.

अर्थ विभाग

दि. ०५ जानेवारी २०१४ रोजी संघाच्या सु.ल.गद्रे सभागृहात पहिला '' गणेश केशव करंदीकर उद्योजक सन्मान सोहळा'' साजरा झाला. अर्थ विभागातर्फे सुरूवात करण्यात आलेल्या ह्या पुरस्काराचे प्रथम मानकरी ठरण्याचा मान श्री. किरण देशमुख, श्री. नंदकिशोर नेमाडे आणि श्री. हेमंत रणदिवे ह्या मुलुंडस्थित प्रस्थापित उद्योजकांना मिळाला.

पॉवर सबस्टेशनची उभारणी, ऑपरेशन आणि मेंटेनन्स ह्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या श्री. किरण देशमुख यांच्याकडे आज ८० हून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. वातानुकूलन क्षेत्राशी सर्वप्रकारे म्हणजे उभारणी, ऑपरेशन आणि मेंटेनन्स आणि सल्लागार म्हणून निगडीत असलेल्या श्री. नंदकिशोर नेमाडे ह्यांच्या व्यवसायाची आजची वार्षिक उलाढाल ४० कोटींवर आहे. तर मान्यवराकडून गौरविण्यात आलेले आणि केटरिंगच्या व्यवसायातले एक प्रथितयश आणि विश्वासार्ह नाव म्हणजे श्री. हेमंत रणदिवे. ह्या तिन्ही सन्मानमूर्तींचा सन्मान महाराष्ट्र टाईम्स ह्या वृत्तपत्राचे संपादक श्री.अशोक पानवलकर यांच्या शुभ हस्ते करण्यात आला. संघाने जर उद्योजक प्रशिक्षण शिबिर आयोजित केले तर त्यास साहाय्य करण्याची इच्छा त्यांनी ह्या वेळी व्यक्त केली...तर कलाकाराइतकाच एखादा उद्योजक हा ही ''क्रियेटीव्ह'' असतो असे मत संघाचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर वझे यांनी आपल्या प्रास्ताविकात मांडले.

संस्थेचे विश्वस्त श्री. म.बा.देवधर ह्यांनी ''आंत्रप्रुईनर''अर्थात उद्योजक याची व्याख्या मांडताना जो ''अंत:प्रेरणे''ने व्यवसाय सुरू करतो तो खरा व्यावसायिक आणि अशा व्यावसायिकांची सामाजिक गरज किती आहे हे ही सांगितले. ह्या पुरस्काराचे

पुरस्कर्ते मुलुंड मधील प्रथितयश बांधकाम व्यावसायिक आणि कायदेतज्ञ श्री. अजित करंदीकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

पुरस्कार सोहळ्यानंतर तीनही सन्मानमूर्तींशी अर्थ विभागाचे अध्यक्ष श्री, डॉ.अभिजित फडणीस यांनी संवाद साधला आणि त्यांचा आत्तापर्यंतचा प्रवास उलगडला. सर्वांनी व्यवसायातले चढ उतार कथन करताना परिवाराचा आधार आणि मानसिकता किती महत्त्वाची असते हे नमूद केले. तिघांमागे खंबीरपणे उभे राहणारे त्यांचे पालक आणि पत्नींचा या वेळी गौरव करण्यात आला.

महाराष्ट्र सेवा संघाच्या अर्थविभागातर्फे आयोजित हा सोहळा उत्तम आणि दिमाखात पार पडला.

संस्कृत विभाग

कै. लाटकरशास्त्री संस्कृत सन्मान पुरस्कारासारख्या मोठ्या पुरस्काराने सन्मानित होण्यामागे माझ्या गुरूंनी केलेले संस्कार कारणीभूत आहेत. त्यांनी मला घडवले असे प्रतिपादन संस्कृततज्ज्ञ डॉ.मल्हार कुलकर्णी यांनी केले. महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंडच्या संस्कृत विभागातर्फे संस्कृतसाठी भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तीस प्रदान करण्यात येणारा ''कै. लाटकरशास्त्री संस्कृत सन्मान पुरस्कार'' या वर्षी दि. २३ नोव्हेंबर २०१३ रोजी डॉ.मल्हार कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. त्या प्रसंगी ते बोलत होते. चित्रफितीद्वारे त्यांनी आपल्या गुरूजनांची उपस्थित रसिकांना माहिती दिली. प्रमुख पाहुणे, संस्कृत नाटककार श्री. प्रभाकर भातखंडे यांच्या शुभ हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्री. प्रभाकर भातखंडे यांनी आपल्या मनोगतात संस्कृतची महती व आवश्यकता व्यक्त केली. संस्कृत भाषेच्या प्रचार व प्रसाराच्या उत्तम कार्यासाठी, महाराष्ट्र शासनाच्या या वर्षीच्या 'महाराष्ट्र राज्य महाकवी कालिदास संस्कृत साधना पुरस्कारा'ने सन्मानित झालेल्या मुंबई विद्यापीठाच्या संस्कृत विभाग प्रमुख डॉ.गौरी माहुलीकर व ख्यातनाम नर्तिका डॉ.संध्या पुरेचा यांचा या प्रसंगी सत्कार करण्यात आला.डॉ.मल्हार कुलकर्णी यांचे कुटुंबीय या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. त्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचा समारोप श्री. प्रभाकर भातखंडे लिखित ''नृत्यकूटम'' या सुरेख नाट्यप्रयोगाने झाला. यंदाच्या राज्य संस्कृत नाट्यस्पर्धेत हा नाट्यप्रयोग सादर करण्यात येणार आहे. संस्कृतप्रेमी रसिकांची लक्षणीय उपस्थिती या सर्व कार्यक्रमाला होती.

मैत्री (महिला विभाग,ऐरोली) -९ वा वर्धापनदिन सोहळा

यावर्षी दि.०२ डिसेंबर २०१३, सोमवार ह्या दिवशी मैत्रीचा ९ वा वर्धापनदिन थाटात साजरा झाला. नेहमीप्रमाणेच कार्यक्रम दोन सत्रांत विभागण्यात आला होता. प्रथम सत्राच्या प्रमुख वक्त्या होत्या प्रसिद्ध लेखिका डॉ.प्रतिमा इंगोले. अनेक पुरस्कारांनी सन्मानित अशा त्या विदर्भकन्या होत. ऐरोलीत विदर्भातील लोकांची संख्या बरीच आहे. त्यामुळे कार्यक्रमास उपस्थितीही बरीच होती. त्यांनी रचलेली लोकगीते मुलुंडस्थित संगीतकार शीला जोशी यांनी सादर केली. त्यामुळे व्याख्यानासाठी एक वातावरण तयार झाले.

''ग्रामीण व शहरी स्त्रियांचे नाते (अनुभवातून) '' असा डॉ.प्रतिमा इंगोले ह्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. हा त्यांच्या प्रबंधाचा विषय असल्यामुळे अनेक ग्रामीण कुटुंबामध्ये राहून, भेटीगाठी घेवून त्यांनी ह्या ग्रामीण स्त्रियांचे जीवन खूप जवळून बघितले, अनुभवले आणि ही ग्रामीण स्त्रीसुद्धा कशी शहरी स्त्रीप्रमाणेच किंवा कधीकधी तिच्यापेक्षाही पुढे जाऊन टक्कर देत असते, हे अनेक उदाहरणे देत त्यांनी विशद केले. त्यांच्याकडे सांगण्यासारखे बरेच काही होते व उपस्थित श्रोतेसुद्धा समरस होऊन ऐकत होते, पण वेळेचे बंधन होतेच.

मध्यंतरात गरमागरम कॉफीचा आस्वाद घेत श्रोते दुसऱ्या सत्रासाठी तयार झाले. दुसऱ्या सत्राचे

आकर्षण होते- कसलेली अभिनेत्री सविता मालपेकर- चित्रपट : काकस्पर्श, नाटक : गाढवाचं लग्न, दूरदर्शन मालिका : फू बाई फू, तुझं माझं जमेना, लक्ष्मी व्हर्सेस सरस्वती ह्या त्यांच्या भूमिका खूपच गाजल्या. प्रथितयश मुलाखतकार श्रेयसी वझे-मंत्रवादी ह्यांनी त्यांना बोलते केले. अगदी वयाच्या तेराव्या वर्षापासून स्थानिक कार्यक्रमांतून अभिनयाला सुरूवात करणाऱ्या सविता मालपेकर ह्यांनी अगदी मोकळेपणाने प्रश्नांना उत्तरे दिली. ह्या सिनेमा नाटकांच्या मोहमयी विश्वात अथक कष्टाने आणि सातत्याने केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांमुळे आपल्या कामावरील निष्ठेने त्यांनी जे प्रबळ स्थान मिळवले आहे त्याबद्दलची कथा ऐकताना अनेकदा उपस्थित महिला भावूक झाल्या. मेहनतीला व कष्टाला पर्याय नाही - हा संदेश त्यांच्या मुलाखतीतून अनेक तरूणींना मिळाला. तसेच हसतहसत जीवनाला सामोरे जा हा मूलमंत्रही त्यांच्या मुलाखतीतून सर्वांना मिळाला.

सविताताईंच्या हस्ते वर्धापनदिनाचा केक कापण्यात आला आणि कार्यक्रमाची सांगता खमंग अशा अल्पोपहाराने झाली. इथून जाताना आमच्या मैत्रीणी बरंच काही घेऊन जातात. बौद्धिक,वैचारिक खाऊ मिळाल्यामुळे समृद्ध होतात. त्याचबरोबर दहाव्या वर्षात पदार्पण करताना मैत्रीच्या कार्यकारी मंडळाची जबाबदारीही वाढली आहे ह्याची जाणीव आम्हाला होत आहे. येणाऱ्या वर्षी आजूबाजूला होत असलेल्या बदलांच्या अनुषंगाने व्याख्याने, कार्यशाळा, विविध स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

मैत्रेयी महिला विभाग, म.से. संघ, मुलुंड
२७ वा वर्धापनदिन सोहळा-

रविवार, दि. २६ जानेवारी २०१४ रोजी साजरा झाला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने सिंधुताई डांगे व सुनीला बापट यांच्या हस्ते झाली. पहिला कार्यक्रम सिंधुताई डांगे पुरस्कृत कै. प्रभावती पागे पुरस्कार प्रदान सोहळा! या वर्षी हा पुरस्कार प्रसिद्ध प्रवचनकार श्रीमती सुनीला बापट यांना सिंधुताई डांगे यांच्या हस्ते दिला गेला. सिंधुताईंनी हा पुरस्कार देण्यामागची भूमिका विशद केली आणि पुरस्कार प्रदानानंतर सुनीलाताईंनी संत जनाबाईवर प्रवचन केले.

दुसरा कार्यक्रम परिसंवादाचा होता! विषय होता ‘मराठी नाटकातील बदलते प्रवाह’ सुषमा देशपांडे, वंदना खरे, संपदा जोगळेकर-कुलकर्णी यांचा सहभाग होता तर समन्वयक होत्या लीना केदारे. नाटकांची वेळ, नाव, विषय, पात्र संख्या, स्वरूप, संगीत इ. मध्ये झालेल्या व होत असलेल्या बदलांबाबत चर्चा केली गेली. परिसंवाद खूप रंगला.

रुचकर भोजनानंतरचा कार्यक्रम होता प्रमोदिनी वडके कवळे यांच्या कथाकथनाचा! त्यांनी खामोशी , क्लोन व येस-आय एम गिल्टी ह्या तीन वेगवेगळ्या घाटातील कथा सांगितल्या. पुण्याच्या बांधवी वाचक मंचातर्फे सुवर्णा दिवेकर लिखित ‘चुकला माझा ठोका’ ही एकांकिका सादर केली गेली. आजच्या काळात ठरणारे रमा-माधवाचे लग्न या विषयावरील विडंबनात्मक नाट्य याद्वारे सादर झाले.



आगामी कार्यक्रम

- बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०१४, सं. ६ वा. प्रख्यात व्यंगचित्रकार विवेक मेहेत्रे सादर करतील व्यंगचित्रे, विनोद यांनी ओतप्रोत भरलेला कार्यक्रम - हास्यरंग
- शनिवार,दि.२२फेब्रुवारी २०१४,सं.६ वा. कै. अशोक सहस्त्रबुद्धे यांच्या स्मरणार्थ पी. सावळाराम यांच्या सुमधुर गीतांचा कार्यक्रम. निवेदन - स्वाती कुलकर्णी
- रविवार, दि. २४ फेब्रुवारी २०१४ ते २६फेब्रुवारी २०१४ - म.से. संघाचे न. चिं. केळकर ग्रंथालय आणि पॉप्युलर प्रकाशनाच्या संयुक्त विद्यमाने 'प्रिय रसिक' हा रसिक वाचकप्रिय कार्यक्रम
- गुरुवार, २७ फेब्रुवारी २०१४, सं.६ वा. - 'साहित्य साधना' पुरस्कार प्रदान सोहळा.
- जागतिक मराठी दिन - रविवार २३ फेब्रुवारी १४- ऐरोली ग्रंथालयातर्फे को.म.सा. प. च्या अभिवाचन स्पर्धेतील पुरस्कारप्राप्त प्रवेशिकांच्या अभिवाचनाचा कार्यक्रम. कलाकार - अंजली पेंढरकर, प्रवीण नार्वेकर, क्षितीजा पेंढरकर

यशोगाथा उद्योजकांची
दांडेकर फर्निचर्स अँड इंटिरीयर्सचे
विवेक आणि विनय दांडेकर

मुलुंड पूर्व येथील मांगल्य सोसायटीमधील दांडेकरांचे घर, दांडेकर म्हणजे सुसंस्कृत मध्यमवर्गीय मराठी कुटुंब. श्री. वसंत दांडेकर बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये ऑफिसर, तर आई मंदा गृहिणी. वर्ष होतं १९८३, दांडेकरांच्या धाकट्या मुलाचा विनयचा एस.एस.सी.चा रिझल्ट लागलेला. आता खरं तर रीतीप्रमाणे घरात एस.एस.सी. नंतर पुढे काय यावर चर्चा व्हायला हवी. नातेवाईकांनी सल्ले द्यायला हवेत. अर्थात दांडेकरांच्या घरात यातलं कांहीच झालं नाही. विनयने सांगून टाकलं; तो आय.टी. आय. जॉईन करणार; आणि ट्रेड घेणार तर कार्पेंटरीचा (चक्क सुतारकाम). विनय आपल्या निर्णयावर ठाम होता. त्याला लहानपणापासून सुतारकामाची, ठाकठोक करण्याची आवड आणि बरोबरच सौंदर्यदृष्टीची जाण होती. त्याला पुढे फर्निचरचाच व्यवसाय करायचा होता. एखाद्या दुसऱ्या घरांत यावर आकांडतांडव झालं असतं; मुलाला कॉमर्स ग्रॅज्युएट होण्याचा सल्ला दिला गेला असता. इथे दांडेकर कुटुंबीय, विनयचे मामा यांनी विनयच्या निर्णयाचा आदर केला. विनयचा मोठा भाऊ विवेक याने तर विनयला व्यवसाय सुरू करायला संपूर्ण पाठिंबा दिला.

आय.टी.आय.चा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर विनय यांनी इंटिरियर्सचा कोर्स केला. हा कोर्स पूर्ण करण्यासाठी त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. कॉलेजमध्ये वेळेवर पोहोचण्यासाठी ते पहाटे ५ वा. निघत असत. या कॉलेजच्या ३५ वर्षांच्या इतिहासातील १०० टक्के उपस्थिती आपल्या अभ्यासक्रमाला देणारा पहिलाच विद्यार्थी अशी विनयची नोंद झाली. हा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विनयने नोकरी न करता व्यवसाय करावा असा विनयचे वडील, तसेच विनयचा मोठा भाऊ विवेक आणि मामा सोमण यांनी आग्रह धरला. वडिलोपार्जित धंदा नाही, व्यवसायाची पार्श्वभूमी नाही, असे

असतानाही मोठ्या हिंमतीने, आणि मोठ्या भावाच्या पाठिंब्याने विनयनी व्यवसायाला सुरूवात केली. विनय सुरूवातीच्या दिवसात, स्वतःच बारा-बारा तास रंधा मारून काम करत असत. हे सलग तीन वर्ष चाललं 'गिऱ्हाईकाचं संपूर्ण समाधान' हे त्यांचं घोषवाक्य आणि म्हणूच ऑर्डर पूर्ण करण्यासाठी ते रात्रंदिवस कामगाराबरोबर झटत त्यांना पहिलं काम मिळालं ते मांगल्यमधले कै. जनार्दन कामत यांचं; आणि ते वर्ष होतं १९८५ यानंतर दांडेकर कुटुंबियांच्या मांगल्य मधल्या जिव्हाळ्याच्या संबंधांमुळे, मांगल्यकरांची कामे विनयना मिळाली. या उमेदीच्या काळात त्यांना अनेकां-नी मोलाची मदत केली. सलग तीन वर्षांच्या सततच्या प्रयत्नानंतर १९८८ मध्ये त्यांनी 'नीलमनगरमध्ये' पहिले दुकान घेतले. व्यवसायातलं पहिलं पाऊल यशस्वी झाल्याचीच ही खूण होती.

विनयचे वडिलबंधू विवेक दांडेकर. विवेक आय.आय.टी.च्या प्रवेश परीक्षेत संपूर्ण भारतातून ११२ व्या क्रमांकने उत्तीर्ण झाले. आय.आय.टी.मधून मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये बी.टेक. केल्यानंतर त्यांनी मार्केटिंगमध्ये एम.बी.ए. केलं. मंडळी, आता जर मी तुम्हाला विचारलं, की विवेक दांडेकर आता कुठे असतील, तर काय बालीश प्रश्न विचारला म्हणून तुम्ही माझी खिल्ली उडवाल, संभावना कराल. आय. आय.टीयन, वर एम.बी.ए. म्हणजे निश्चितच एखाद्या मोठ्या बहुराष्ट्रीय उद्योगसमूहामध्ये लट्ठ पे पॅकेज असलेली सिनियर एक्झिक्यूटीव्हची नोकरी. हे तसं अगदी रूढ समीकरण नाही का? हां! एक दोन कंपन्या बदलल्या असतील त्यांनी, पण वस्तुस्थिती वेगळीच आहे. विवेकदेखील एक वेगळंच रसायन आहे, विवेक चक्क फर्निचर्सचे दुकान चालवतात. विनयबरोबर ते देखील दांडेकर फर्निचर्स अँड इंटिरियर्सचे एक संचालक आहेत. 'गोदरेज अँड बॉईसमध्ये'इडीपी डिपार्टमेंटमध्ये विवेकने तीन वर्षे एक्झिक्यूटीव्ह म्हणून काम केले. नंतर मात्र आपल्या अंतर्मनाचा कौल मानून ते आता घरच्याच असलेल्या विनयच्या व्यवसायात उतरले.

आधी म्हटल्याप्रमाणे दांडेकर बंधूंनी प्रथम नीलमनगरमध्ये जागा घेतली, मग मात्र त्यांच्या व्यवसायाची घोडदौड सुरू झाली. निमेश इंडस्ट्रियल प्रिमायसेस येथे वर्कशॉप आणि तळेगाव येथे दांडेकरची मुहूर्तमेढ असा त्यांच्या व्यवसायाचा चढता आलेख आपल्याला थक्क करतो. मुलुंड पूर्व येथील सी.डी. देशमुख उद्यानाजवळ दिसणारी दांडेकर फर्निचर्स अँड इंटिरीयर्सची भव्य शोरूम म्हणजे विनय आणि विवेकच्या मेहेनतीला आलेले सुमधूर फळ. आज दांडेकर फर्निचर्सतर्फे चार भिंतीच्या आतले सर्व काम केले जाते. घराचं इंटिरियर, फर्निचर, पेंटींग, ग्रिल्स, ॲल्युमिनियम स्लाइडींग , सिव्हिल, इलेक्ट्रिकल, प्लंबिग जे म्हणाल ते काम केले जाते. काम लहान असो वा मोठे कामाच्या दर्जामध्ये तडजोड केली जात नाही. कुशल कामगार, उत्तम प्रतीचा कच्चा माल, दिलेली वेळ तंतोतंत पाळणे या गुणांमुळे दांडेकर हे एक फर्निचर विश्वातले विश्वासार्ह नाव झाले आहे.

दांडेकर बंधूंनी घरगुती कामांबरोबरच अनेक व्यावसायिक तसेच औद्योगीक व्यवस्थापनांची कामे देखील चोखपणे केली आहेत. नायर इंडिया, एल.अँड टी. (ट्रॅक्टर्स इंजिनिअर्स), श्रद्धा सर्व्हिसेस ठाणे, स्प्रेटेल लि., वात्सल्य ट्रस्ट, वामन शंकर मराठे ज्वेलर्स ठाणे, स्वाद थाळी ठाणे, पायमर मेडिकल कॉलेज तळेगाव, आय.एन.एस. शिवाजी लोणावळा,पितांबरी प्रॉडक्टस् ही त्यातील काही ठळक नावे. विनय यांनी संभाषणाच्या ओघात सांगितलं की पितांबरीमध्ये रंगकाम फक्त रात्री करावे लागे, सकाळी सर्व खुर्च्या नीट व्यवस्थित लावून ठेवाव्या लागत. रंगाचा एक डागही जमिनीवर नसे. 'दाग अच्छे लगते है' हे फक्त सर्फ च्या जाहिरातीसाठी. एरवी न जाणारे डाग कुणालाही आवडत नाहीत. अशा प्रतिकूल परिस्थितीत विनयनी काम संपवलं. या त्यांच्या उत्तम कामगिरीसाठी प्रभूदेसाई यांनी त्यांना प्रशस्तिपत्र आणि आपली बाकीची सर्व कामे देखील बोनस म्हणून देऊन टाकली. असंच आणखी एक कुवतीचा कस पहाणारं काम म्हणजे श्रद्धा स्नॅक्स्,ठाणे यांचे काम. ते देखील दांडेकरांनी रात्रंदिवस खपून सात दिवसात पूर्ण केले. आय.एन.एस. शिवाजी, लोणावळा तसं मनावर

दडपण आणणारं काम नेव्हीच्या काटेकोर शिस्तीत राहून विनय-विजय यांनी ते पूर्ण केलं. त्यांच्या मते पूर्ण होईपर्यंत प्रत्येक छोटंमोठं काम एक आव्हानच असतं. व्यापारी मराठी मनाला मृदू गोड, मधुर बोलणे ही एक चैन वाटते. सदैव गोड बोलण्याची चैन मराठी व्यापाऱ्याला तर परवडतच नाही सगळा रोखठोक मामला. ‘पुणेरी दुकानदारीचे’ अनेक किस्से आपण ऐकलेलेच आहेत. ‘घ्यायचाय ? की फक्त चौकशी’, ‘बजेट काय’ , ‘कशाला महागाचं घेताय हे घ्या त्यापेक्षा स्वस्त आणि मस्त’असे फुकटचे सल्ले दुकानात ऐकायला मिळत. आता जमाना बदललाय असं म्हणतात.

मराठी उद्योजकही मृदू बोलू लागले आहेत. दांडेकर बंधू हे अशाच नव्या पिढीचे प्रतिनिधी. दांडेकर बंधू आलेल्या प्रत्येक ग्राहकाशी तोंडात ‘रसगुल्ला’ठेऊनच बोलतात. हीच शिकवण कर्मचाऱ्यांना देखील आहे. त्यांच्या या मृदू गोड हंसतमुख स्वभावामुळे आणि अर्थातच त्याबरोबर कामाच्या गुणवत्तेमुळे त्यांनी आतापर्यंत १८००० ग्राहक जोडले आहेत आणि ही म्हणजे आता एक न संपणारी साखळीच झाली आहे. (त्यांच्याकडे जवळजवळ १०० कर्मचारी कायम व हंगामी आहेत.) संभाषणाच्या ओघात विनयला विचारलं, सदैव हंसतमुख राहाणं कसं काय जमतं? विनयनी पट्कन उत्तर दिलं, माऊलीची, विठ्ठलाची कृपा. विनय, विवेक दरवर्षी चालत पंढरीच्या वारीला जातात. बघा हं, २५० कि.मी. अंतर ते मोठ्या श्रद्धेने दरवर्षी पार करतात. आणि हीच श्रद्धा त्यांना आतील समाधान आणि बळ देते. विनयप्रमाणे विवेकला देखील फिरण्याची आवड आहे विवेकना विचारलं आय. आय.टी.चं वलय सोडून या विश्वात वावरताना खेद वाटतो का? परत नोकरीकडे वळावसं कधी वाटलं का ? विवेकने क्षणाचाही विलंब न लावता ‘नाही’म्हणून सांगितले.

त्यांच्या व्यवसायातदेखील त्यांना नवनवीन प्रयोग करायला वाव आहे. व्यवस्थापनाची वेगवेगळी तंत्र-मंत्र ते त्यांच्या उद्योगात वापरू शकतात. या दोघा बंधूंची व्यवसायाप्रती असलेली निष्ठा असामान्यच आहे. दांडेकर फनिचर्स अँड इटिरियर्सचा आतापर्यंत २९ वर्षांचा प्रवास पूर्ण झाला आहे. या व्यवसायात कुटुंबाची साथ अतिशय मोलाची असते. विवेक आणि विनय या दोघांना त्यांच्या पत्नी, मुले , आईवडील यांची अतिशय मोलाची साथ मिळाली आहे. विवेकच्या पत्नी क्षमा दांडेकर एल.आय.सी. येथे नोकरी करतात , व त्यांचा मुलगा अक्षय आय.आय.टी. पवई येथे एरोस्पेस इंजिनिअरींगचे शिक्षण घेत आहे. विनय यांच्या पत्नी सौ. भावना ‘होली एंन्जेल्स’ मध्ये शिक्षिका म्हणून काम करतात. तर अभिनयाची आवड असणारी त्यांची लेक अवनी फार्मसी मध्ये पदवी घेत आहे. दांडेकर बंधूंच्या आजपर्यंतच्या वाटचालीत त्यांचे आईवडील, विनयचे सासरे डॉ.विश्वास मेहंदळे, विवेकचे सासरे बापू थोरात तसेच परिवाराने त्यांना मानसिक,आर्थिक बळ दिले आहे. दांडेकर समूहाचे सी.ए. काणे त्यांच्या अनेक प्रश्नांची उकल करतात. जनकल्याण बँकेने तर गेली २० वर्षे त्यांना अर्थपुरवठा हवा तेव्हा केला आहे. आतापर्यंतच्या व्यावसायिक वाटचालीत ठाणे येथे झालेल्या ‘फर्निचर एक्झिबिशन’मध्ये पहिलं बेस्ट डिस्प्ले बक्षिस त्यांना कै. आनंद दिघे-अनंत तरे यांच्याकडून मिळाले होते. ‘विवेक’ मासिकाच्या ठाणे उद्योगश्री पुरस्काराचे २०११ ते मानकरी आहेत. त्यांच्या सामाजिक जाणिवाही तेवढ्याच प्रगल्भ आहेत. भविष्यातल्या त्यांच्या स्वप्नांबद्दल विचारले असता समजलं, त्यांना मुलुंडमध्ये मोठी शोरुम उभी करायची आहे. त्यांच्या यशस्वीतेचं बीज त्यांनी घेतलेल्या कॅचलाईनमध्ये आहे. त्या ओळी आहेत,

प्रत्येक घरासाठी,
घरातल्या प्रत्येकासाठी
सजावटीचे वेगळेपण,
त्यातही जाणवेल आपलेपण,

थोडक्यात ‘दांडेकर’ म्हणजे आपुलकी जपणारी माणसं आहेत!

अरूण भंडारे/रजनी करंदीकर
९८२००५५७७४/ ९८९२४७३३२७

एक अनुभव - आपुलकीचा

मैत्रीच्या वर्धापन दिनाच्या दिवशी घडलेला हा प्रसंग तसा अगदी अनपेक्षित आणि तितकाच आनंददायक! डॉ. प्रतिभा इंगोले यांचे लोककथांवरील अत्यंत उत्तम असे व्याख्यान संपल्यावर मला माझ्या काही वैयक्तिक कामांसाठी लवकर निघायचे होते म्हणून श्रीमती देवधरांना तसे सांगून मी बाहेर पडलो. सर्व कामे आटोपून, सेक्टर नं. ५ मधील पेट्रोलपंपावर स्कूटरमध्ये पेट्रोल भरून मी घरी परतण्यासाठी निघालो. वाटेत से.४ मध्ये फर्निचरची शोरूम आहे. या शोरूममध्ये २ बेड्स बनविण्याची ऑर्डर दिली होती. आमच्या एकंदर शारीरिक विस्ताराशी सुसंगत अशा मोठ्या आकाराच्या बेड्स बरेच दिवस मिळत नव्हत्या. त्याची चौकशी करण्यासाठी मी स्कूटर शोरूमसमोर उभी केली.

नेहमी पार्किंगच्या नियमांचे काटेकोर पालन करणारा मी, त्या दिवशी मात्र ऑड आणि इव्हन दिवसांच्या पार्किंगचे नियम दुर्लक्ष करून शोरूममध्ये शिरलो होतो. माझ्या अंदाजाप्रमाणे मला त्या शोरूममध्ये केवळ २ मिनिटे लागणार होती आणि अंदाजानुसार केवळ २-३ मिनिटेच लागली. मी शोरूमच्या बाहेर आलो. बाहेर स्कूटर गायब!

स्कूटर ट्रॅफिक वाल्यांनी उचलून नेली असणार असा अंदाज बांधून मी से. ५ मधील आरटीओ (वाहतूक विभाग) च्या कार्यालयात जाण्यास निघालो. बऱ्याच वेळ रिक्षा मिळेना म्हणून वैतागलो होतो. इतक्यात मोटरसायकलवरून जात असलेला एक तरूण अचानक माझ्याजवळ थांबला व माझी चौकशी करू लागला. त्याने ज्या आस्थेने, आपुलकीने माझी चौकशी केली, त्यावरून तो मला ओळखत असावा याचा मला अंदाज आला. मी त्याला घडलेला प्रसंग सांगितला व मला बराच वेळ रिक्षा मिळाली नसल्याचेही सांगितले.

''साहेब, मागे बसा!'' त्याने फर्मावले. त्याच्या धैर्याचे मला कौतुक वाटले आणि मला ओळखणाऱ्या सर्वांना ते वाटेल याची मला खात्री आहे. ''अरे पण तू कोण हे तरी सांग'' मी. ''साहेब, बसा, आपण आरटीओ कडे जाऊ. मग सांगतो!'' मी निमूटपणे मागे बसलो. से. ५ च्या कार्यालयात आम्ही पोहोचलो. माझी स्कूटर नुकतीच तेथे आणण्यात आली होती.

आम्ही मोटारसायकलवरून उतरलो. तो तरूण पटकन् संबंधित पोलिस अधिकाऱ्याकडे गेला. आणखीही वाहतूक पोलिस तिथे होते. माझ्याकडे बघून आपापसात त्यांची काहीतरी कुजबूज झाली व सर्व पोलिस कौतुकाने माझ्याकडे पाहू लागले. आणि तो अधिकारी माझ्याकडे आला. माझ्याकडे अत्यंत आदराने पाहात त्याने माझी गाडी सोडून देण्याचे फर्मान काढले. ''साहेब, महाराष्ट्र सेवा संघातर्फे चालविल्या जाणाऱ्या अभ्यासिकेचे यांच्यामध्ये बरेच सभासद आहेत. लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या अभ्यासासाठी हे सर्व पोलिस तुमच्या संस्थेत येतात आणि त्यांचे प्रश्न आपुलकीने लक्षांत घेऊन तुम्ही सर्वांनी केलेल्या वेळापत्रकांतील वाढीव वेळेच्या सहकार्याने यांतील बरेच पोलिस सब-इन्पेक्टर झाले आहेत व काही होऊ घातले आहेत. तेव्हा तुमची स्कूटर आम्ही कशी अडवणार ?घेऊन जा! ''

मी मघाच्या तरुणाला त्याचे नांव विचारले, तेव्हा तो म्हणाला, ''साहेब नावात काय आहे ? ओळख ठेवा!''

प्रदीप सप्रे - उपाध्यक्ष, ऐरोली शाखा

कलाविभाग

महाराष्ट्र राज्य बाल नाट्य स्पर्धेत महाराष्ट्र सेवा संघाच्या कलाविभागाने डी.व्ही. कुलकर्णी लिखित ‘जिनीमिनीची गोष्ट’ हे नाट्य सादर केले. मुंबई केंद्रातून हे बालनाट्य पहिल्या क्रमांकावर आले आहे.

सौ. वीणा नाटेकर - दिग्दर्शन, विनायक जोगळेकर - नेपथ्य, आयुष्या तापस - अभिनय, मन्विता जोशी - अभिनय यांनाही पारितोषिके मिळाली. अभिनंदन!

या नाटकाचा एक प्रयोग ठाण्याला ‘गडकरी रंगायतन’ मध्ये झाला. हा प्रयोग पाहून प्रभावित झालेले एक रसिक प्रेक्षक शशी बेडेकर यांचे पत्र सोबत जोडले आहे.

शशी बेडेकर 10/1/2014

A-7/201, धुली गार्डन, ढोकाळी नाका, मनोरमा नगर, ठाणे - 400 607. फोन : 25312100

॥ श्री ॥

प्रति,

अध्यक्ष, महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड.

"जिनी मिनीच्या गोष्टी बद्दल,

मी गडकरीला अंतिम केलेला प्रयोग पाहिला. रंगमंचावर 40/45 मिनीटे फक्त दोनच लहान मुली वावरत आहेत हे मी तरी प्रथमच पाहिले आहे.

नाटकाचा विषय मनोविश्लेषणाचा होता. अतिशय कठीण आणि तितकाच नाजूक. या विषयावर केवळ मुलांसाठी नाटक लिहीणे ही अतिशय कठीण गोष्ट असून लेखक श्री. कुलकर्णी ह्यांनी अप्रतिम लिहिले आहे.

रंगमंचा अवकाश, अंधार, प्रकाश आणि भूमिकेत शिरून जिनी, मिनी ह्यांनी केलेले काम मनाला भावून गेले. एकमेकांच्या मनात ऐकलेल्या वाक्यांमुळे विचारांची 'बीजे' कशी रुजतात आणि मनात अनेक शंकाकुशंका निर्माण होऊन व्यक्तीमत्वात बदल कसा होतो हे जिनी मिनीत झालेल्या बदलांवरून खूप सुंदर आखला.

दोघींच्या हालचालीत सहजता होती. नाट्यातील वाक्यांचा माझ्यावर परिणाम होत होता ह्याचा अर्थ जिनी मिनीवरही होतच असणार - त्यांना त्या भूमिकेतून बाहेर काढणे खूप आवश्यक आहे. कारण ह्या अर्धवट वयात आई बाबाच मुलांचे रोलमॉडेल्स असतात.

नेपथ्य, प्रकाश, संगीत साजेसे होते.

फक्त जिनी मिनीच्या आवाजाची पट्टी एक पायरी खाली लागली असावी असे मला वाटते. पूर्ण प्रयोगात नाट्यगृहात शांतता होती, आजूबाजूचे डोळे टिपत होते. अशा नाट्याला बक्षीस मिळू नये ह्याचे खूप आश्चर्य वाटत आहे.

प्रत्येक घटनेच्या नाण्यावर हेड टेल अशा दोन बाजू असतात त्यादिवशी नाटकाच्या हाताला 'टेल' होती ती स्विकारायची!

महाराष्ट्र सेवासंघाने असेच नितनिराळे उपक्रम करावे ही इच्छा.

कळावे.

शशी बेडेकर (प्रेक्षक)